# वाणिज्य संघटना बैठकीचे इतिवृत्त दि.१६/११/२०१८

| अ.क. | सर्वसाधारण विषय | करावयाच्या कार्यवाहीचा तपशील | कार्यवाही कोणत्या स्तरावर | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | शासकी वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा केंद्रवर बाहेरील व्यक्तिंचा होणारा उपद्रव | परीक्षा केंद्राची हद्द जेथून सुरु होते त्या ठिकाणी परीक्षा व्यवस्थापनाच्या कर्मचाऱ्यांशिवाय अन्य व्यक्तीस प्रवेश देऊ नये. सदरची बाब संवेदनशील असल्यामुळे सर्व शिक्षणाधिकारी यांनी याबाबत संबंधीत यंत्रणेला सूचना निर्गमित कराव्यात. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| २. | परीक्षा केंद्रावर येणाऱ्या अडचणी | परीक्षेसाठी उपलब्ध करुन दिलेल्या काही केंद्रावर परीक्षेच्यावेळी विद्युत पंरवठा खंडीत होतो. याबाबत जिल्हापरिषद स्तरावरील विस्तार अधिकारी यांनी याबाबत लक्ष द्यावे.<br>माध्यमिक शाळांच्या तुलनेने महाविद्यालयांमध्ये यंत्रणा चांगली असते. त्यामुळे ज्या महाविद्यालयामध्ये अशा सुसज्ज यंत्रणा असतील त्याठिकाणी परीक्षेचे नियोजन करावे जेणेकरुन अशा अडचणी उद्‌भवणार नाही. शिक्षणाधिकारी यांनी परीक्षार्थींची गैरसोय होणार नाही या अनुषंगाने संबंधीत यंत्रणेस सूचना द्याव्यात.<br>संघटनेने सुध्दा महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद तसेच संचालक, तंत्रशिक्षण यांना अडचणीबाबत लेखी निवेदन सादर करावे.<br>शिक्षणाधिकारी यांनी महाविद्यालयाकडून परीक्षा कालावधीमध्ये सुविधा उपलब्ध होणेबाबत सविस्तर या कार्यालयास कळवावे. जेणेकरुन परीक्षा परिषदेस याबाबाबत या कार्यालयाकडून पाठपूरावा करता येईल. | शिक्षणाधिकारी / संघटना स्तरावर | |
| ३. | संघटना बैठकीबाबत | शिक्षणाधिकारी यांनी दर तीन महिन्यांनी होणाऱ्या संघटना सभांच्या वेळी वाणिज्य संघटनेस देखील निमंत्रित करावे. व संघटना सभांच्या दिवशीच मा. आयुक्त यांच्या आदेशानुसार घ्यावयाची समन्वय समितीची सुध्दा बैठक घ्यावी. त्याचवेळी परीक्षा केंद्र स्थलांतरणाच्या समस्येबाबतही जिल्हास्तरावर चर्चा करावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| ४. | सर्वसाधारण सूचना | संघटना प्रतिनिधी यांनी उपस्थित केलेल्या तांत्रिक समस्या- विद्युत पुरवठा खंडीत होणे, टायपिंग फॉन्टबाबत अडचणी, बैठक व्यवस्था सोयीची नसणे, कीबोर्ड ऑपरेट न होणे, परीक्षेच्या दरम्यान त्रयस्थ व्यक्तीकडून होणारा उपद्रव इ. अशा सर्व अडचणीबाबत संघटनेने राज्यस्तरावर होणाऱ्या संघटना बैठकीमध्ये चर्चा करावी. | संघटना स्तरावर | -- |

शिक्षण उपसंचालक
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर